# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२६

---------------------------------------------

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ / आषाढ १, १९४८ (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | महसूल मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | वने मंत्री | |
| (३) | आदिवासी विकास मंत्री | |
| (४) | कृषी मंत्री | |
| (५) | सामाजिक न्याय मंत्री | |
| (६) | रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री | |
| (७) | मदत व पुनर्वसन मंत्री | |
| (८) | मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री | |

-------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २५**

-------------------------------------------

### राज्यात बंधनकारक केलेली "फार्मर आयडी" नोंदणीची प्रक्रिया गुंतागुंतीची असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत

**(१)** * **९०८८ श्री.विक्रम काळे, श्री.पंकज भुजबळ, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना कृषी योजनांचे अनुदान मिळणेकरीता "फार्मर आयडी" आवश्यक असून राज्यातील एकूण १ कोटी ७१ हजार खातेदार शेतकऱ्यांपैकी सुमारे ३९ लाख शेतकऱ्यांनी फार्मर आयडी' नोंदणी केलेली नसून शहापूरमध्ये (जि.ठाणे) ३४ हजार ७०४ खातेदार शेतकरी असून त्यापैंकी २९ हजार ४३२ शेतकऱ्यांनी, अमरावती जिल्ह्यामध्ये सुमारे ९४ हजार शेतकऱ्यांनी अद्याप 'फार्मर आयडी' नोंदणी केलेली नसल्याचे तसेच नागपूर विभागातील १४ लाख ७३ हजार शेतकऱ्यांपैकी अनेकांचे आयडी तयार होण्याची प्रक्रिया प्रलंबित असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी माहे नोव्हेंबर, २०२४ पासून ऐच्छिक स्वरूपात सुरू झाली असून माहे एप्रिल, २०२५ पासून ती बंधनकारक करण्यात आली आहे, सदर योजना शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्यात शासनास अपयश आल्यामुळे शहापुरमध्ये पाच हजार शेतकऱ्यांना फार्मर आयडीअभावी खत मिळविताना अडचणी येत असून कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी आणि आगामी खरीप हंगामात बियाणे, खते व औषधे यांसारख्या कृषी निविष्ठांच्या खरेदीसाठी 'फार्मर आयडी' अनिवार्य केल्यामुळे नोंदणी नसलेल्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर फार्मर आयडी नोंदणीची प्रक्रिया गुंतागुंतीची असून अनेक शेतकऱ्यांना संकेतस्थळावरील लघुसंदेश समजत नसल्यामुळे फार्मर आयडी उपलब्ध होऊ न शकल्याने ठिंबक सिंचन व इतर कृषी योजनांच्या अनुदान तसेच पीएम किसान सन्मान निधी, पीक विमा, बियाणे/खत अनुदाने, कर्ज सुविधा आणि नैसर्गिक आपत्तीत त्वरित नुकसान भरपाई यांसारखे महत्त्वाचे फायदे मिळण्यापासून लाखो शेतकरी वंचित राहिले असून नोंदणीसाठी दिलेली दिनांक २० मे, २०२६ ही अंतिम मुदत अत्यंत कमी असून, ग्रामीण भागातील तांत्रिक अडचणी व सेवा सुविधा केंद्रांवरील ताण लक्षात घेता ही मुदत वाढवून देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना फार्मर आयडी उपलब्ध करुन देण्याकरीता महाडीबीटी संकेतस्थळावर लॉगीन करण्याची पध्दत बदलून त्यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी तसेच ती सोप्या रीतीने शेतकऱ्यांना अवगत होण्याकरीता तसेच फार्मर आयडीअभावी शेतकऱ्यांची झालेली दुरवस्था दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) हे अंशतः खरे आहे.

दैनिक सामना मध्ये १९ एप्रिल, २०२६ रोजी शहापुरात ५००० शेतकऱ्यांकडे फार्मर आयडीच नाहीत या शीर्षकाखाली बातमी प्रकाशित करण्यात आलेली आहे. सदर बातमी अमरावती जिल्हा व नागपूर विभागाशी संबंधित नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी दिनांक १५ एप्रिल, २०२५ पासून फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आलेला आहे.

खतासाठी फार्मर आयडी अद्याप अनिवार्य करण्यात आलेला नाही. सद्य:स्थितीत आधार कार्ड लिंक करून खतांचे वाटप सुरु आहे.

सद्यःस्थितीत राज्यात एकूण खातेदार संख्या १.७१ कोटी असून यापैकी जवळपास १.३३ कोटी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी साठी नोंदणी केलेली आहे. उर्वरित शेतकऱ्यांचे फार्मर आयडी काढण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

फार्मर आयडी दिनांक २० मे, २०२६ ही अंतिम मुदत नसून क्षेत्रिय स्तरावर नोंदणी प्रक्रिया प्रगती पथावर आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्यापही फार्मर आयडी काढलेले नाहीत अशा शेतकऱ्यांनी नजीकच्या नागरी सुविधा केंद्रामध्ये अथवा स्वतः देखील नोंदणी करू शकतात. या बाबत क्षेत्रिय स्तरावर विविध वृत्तपत्रातून, समाज माध्यमातून जनजागृती व प्रचार व प्रसिद्धी करण्यात आलेली आहे आणि अजून देखील प्रचार प्रसिद्धी करण्यात येत आहे.

(४) संबंधित नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरुळी देवाची (पुणे) येथील जुन्या पालखी मार्गावर अतिक्रमण करून त्यालगतच्या गायरान जमिनीतून अनधिकृत मुरूम उत्खनन केल्याबाबत

**(२) * ८७८४ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील उरुळी देवाची परिसरातील मंतरवाडी बाह्यवळण मार्गालगत आदर्शनगरकडे जाणाऱ्या ‘जुन्या पालखी मार्गावर’ अतिक्रमण झाल्यामुळे सदर ऐतिहासिक व सार्वजनिक मार्ग अरुंद झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पालखी मार्गावरील अतिक्रमण आणि त्यालगतच्या ‘गायरान’ क्षेत्रात अनधिकृतपणे मुरूम उत्खनन करून पर्यावरणाची हानी होत असल्याबाबत स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकामे नाममात्र दाखवून त्याआधारे मुरूम उत्खननाची परवानगी मिळवून, प्रत्यक्षात ‘लाखो ब्रास’ मुरुमाचे अनधिकृतरित्या उत्खनन व व्यावसायिक विक्री करून शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान केल्याचा आरोप सदर तक्रारीत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नियमांचे उल्लंघन करून अवैधरित्या उत्खनन करणाऱ्या घटकांवर, तसेच याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित क्षेत्राच्या महसूल अधिकाऱ्यांवर शासनाने आतापर्यंत कोणती दंडात्मक किंवा फौजदारी कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच अनधिकृत उत्खननाचा ‘पंचनामा’ करून संबंधित दोषींकडून बाजारभावाप्रमाणे दंडाची वसुली कधीपर्यंत केली जाणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मुख्याधिकारी फुरसुंगी-उरुळीदेवाची नगरपरिषद यांचेकडील दिनांक ११/०६/२०२६ रोजीच्या अहवालानुसार सदर आदर्शनगरकडे जाणाऱ्या विद्यमान रस्त्याच्या दुतर्फा काही ठिकाणी पत्रे उभारल्याचे निदर्शनास आले आहे.

(२), (३), (४) व (५) हे अंशत: खरे आहे.

उरुळी देवाची येथील पालखी मार्गावरील गायरान क्षेत्रात अनधिकृतपणे मुरुम उत्खनन झालेले नसलेबाबत तहसिलदार हवेली यांनी नमूद केले आहे.

सदर गायरान क्षेत्रालगतच्या स.नं.३२२/१/१ मधील उत्खननाबाबत श्री.कानिफनाथ होले व स.नं.१३/२/१ मधील उत्खननाबाबत श्री.उल्हास शेवाळे यांनी तक्रार केली होती.

स.नं.३२२/१/१ प्रकरणी तहसिलदार हवेली यांचेकडून दिनांक १३/०३/२०२६ अन्वये रुपये ७२,८३,९०१/- चे दंडात्मक आदेश पारित करून मे. विकास असो. तर्फे श्री.के. महिपाल विजयकुमार व मरकळे यांचे हिश्श्यावर अनधिकृत उत्खननाचा बोजा दाखल करणेत आलेला आहे. तरी देखील सदर मिळकतीमध्ये ८०० ब्रासचे अनधिकृत उत्खनन झालेले आहे.

स.नं. १३/२/१ या मिळकतीमध्ये भूखंड सपाटीकरण व २०० ब्रास उत्खनन व वाहतूक करणेस तहसिलदार हवेली यांनी परवानगी दिली होती. तथापि, स.नं. १३/२/१ मध्ये पंचनाम्यानुसार १०,५०० ब्रास गौण खनिज उत्खनन झाले आहे.

उक्त दोन्ही मिळकती (स.नं.३२२/१/१ व स.नं. १३/२/१) प्रकरणी अचूक मोजमापाकामी ईटीएस मोजणी करणेकामी संबंधितास तहसिलदार हवेली यांनी दिनांक ०९/०६/२०२६ रोजी पत्रव्यवहार केलेला आहे.

उक्त मिळकती मधील एकूण उत्खनन, त्यापैकी यापुर्वी करणेत आलेली कारवाई, कारवाई नंतर झालेले उत्खनन, त्यापैकी परवानगी घेतलेले ब्रास या सर्वांचा ताळमेळ घेऊन सदर प्रकरणी शासनाचे प्रचलित धोरणाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत तहसिलदार हवेली यांना जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयामार्फत सूचीत करण्यात आले आहे.

हवेली तालुक्यामध्ये गौणखनिज उत्खननाबाबत कारवाई करणेकामी पथक नेमण्यात आलेले असल्याने अनधिकृत गौणखनिज उत्खनन व वाहतूक होत असल्याची बाब निदर्शनास येताच शासन तरतुदीप्रमाणे दंडाची तसेच फौजदारी कारवाई करणेची कार्यवाही तहसिलदार यांचे स्तरावरून वेळोवेळी करणेत येत आहे.

-----------------

## राज्यात एचटीबीटी कापूस बियाण्यांचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांवर कारवाई करण्याबाबतच्या परिपत्रकाचा पुनर्विचार करण्याबाबत

**(३) * ९६७२ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कमी लागवड खर्चात अधिक उत्पादन मिळविण्यासाठी शेतकऱ्यांसमोर एचटीबीटी कापूस बियाण्याशिवाय पर्याय नसताना शासनाच्या कृषी विभागाने दिनांक ८ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान एचटीबीटी कापूस बियाण्यांचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांवर कारवाई करण्याबाबत परिपत्रक निर्गमित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिपत्रकामुळे राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून, विविध शेतकरी संघटनांकडून या निर्णयाचा निषेध करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मजुरीचा वाढता खर्च आणि तण नियंत्रणासाठी 'एचटीबीटी' तंत्रज्ञान सोयीचे वाटत असल्याने अनेक शेतकरी या बियाण्यांकडे वळत असताना, त्यांना तंत्रज्ञानाचा पर्याय उपलब्ध करून देण्याऐवजी दंडात्मक कारवाई करण्याचे धोरण शासन राबवत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक हित आणि आधुनिक बियाण्यांची गरज लक्षात घेता, शासन दिनांक ८ एप्रिल, २०२६ च्या परिपत्रकाबाबत पुनर्विचार करणार आहे काय, असल्यास, त्याबाबतचा निर्णय कधीपर्यंत घेतला जाईल,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) व (२) हे खरे नाही. सन २०१८ या वर्षात राज्य शासनाकडून अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाणेबाबत स्थापन करण्यात आलेल्या विशेष चौकशी पथकाच्या अहवालातील सूचनांप्रमाणे कार्यवाही करणेबाबत कृषी आयुक्तालयाच्या दिनांक ०८/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक यंत्रणांस सूचना देण्यात आल्या आहेत. सदर पत्रात शेतकऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कुठल्याही सूचना देण्यात आल्या नसून शेतकऱ्यांचे प्रबोधन व जनजागृती करणेबाबत उल्लेख केला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळांतर्गत कौशल्य प्रशिक्षण योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४) * ९२९२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील, ॲड.अनिल परब, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.कृपाल तुमाने, श्री.पंकज भुजबळ, श्री.सुनिल शिंदे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागांतर्गत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत १८ ते ४५ वयोगटातील आदिवासी युवक-युवतींसाठी रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षण योजना राबविण्यात येत असून, शहापूर (जि.ठाणे) येथील शासकीय निवासी वसतिगृहातील ६० विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी ठाणे येथील "गौशिक टेक्नॉलॉजी एलएलपी" या संस्थेसोबत सामंजस्य करार करून, सदर संस्थेस सुमारे ८ लाख १५ हजार ८८० रुपये अदा करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशिक्षणाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार विभागाने चौकशीसाठी गठीत केलेल्या समितीने दिलेल्या अहवालानुसार सदर प्रशिक्षणामध्ये ५७ दिवसांचे प्रशिक्षण देणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात केवळ ५ दिवस किंवा आठवड्यातून केवळ एक दिवस (रविवार) प्रशिक्षण देऊन, संगणकीय प्रणालीमध्ये छेडछाड करून प्रशिक्षणार्थींची बनावट उपस्थिती दर्शवून शासनाची फसवणूक केल्याची बाब दिनांक १९ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शहापूर येथे गौशिक टेक्नॉलॉजी (जि.ठाणे) संस्थेच्या चालकांविरुध्द नोंदविण्यात आलेल्या एफआयआर प्रकरणी व या गैरव्यवहारास पाठीशी घालणाऱ्या संबंधित विभागातील दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच सदर दोषी संस्थेला काळ्या यादीमध्ये समावेश करण्याबाबत व अपहार केलेली रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांनी दिनांक ०१/०४/२०२६ रोजी केलेल्या चौकशीमध्ये Gowshik Technologies LLP, Thane या संस्थेने सामंजस्य कराराच्या अटींचे उल्लंघन करून शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची दिशाभूल केल्याचे चौकशीत स्पष्ट झाले. त्यानुसार संस्थेच्या चालकांविरुध्द दिनांक ०८/०४/२०२६ रोजी शहापूर पोलीस ठाणे येथे FIR क्रमांक ०२५२ दाखल करण्यात आला आहे.

सदर संस्थेस काळ्या यादीमध्ये टाकून त्यांची बँक गॅरंटी जप्त करुन बँक गॅरंटीची रक्कम शबरी महामंडळाच्या बँक खात्यामध्ये वर्ग करण्याची कार्यवाही महामंडळामार्फत सुरु आहे. तसेच सदर प्रकरणाच्या अनुषंगाने कौशल्य, रोजगार व उद्योजकता विभागास त्यांचेस्तरावरुन महाराष्ट्र राज्य कौशल्य

विकास सोसायटी यांना सदर संस्थेविरुध्द कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्याबाबत कळविण्यात आले आहे. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत वसतिगृहातील मुलांच्या प्रशिक्षणासाठी निधी देण्यात आला नसल्याने अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धडगाव (नंदुरबार) येथील जलबिंदू योजनेच्या मजुरांवरील जाचक अटी रद्द करण्याबाबत

**(५) * ९५२७ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धडगाव (जि.नंदुरबार) या दुर्गम भागात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत 'जलबिंदू' योजनेचे काम करणाऱ्या मजुरांवर लावलेल्या तांत्रिक व जाचक अटींमुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुर्गम व डोंगराळ भागातील नेटवर्कची तीव्र समस्या लक्षात घेता, 'नॅशनल मोबाईल मॉनिटरिंग सिस्टम' सारख्या ऑनलाईन प्रणालीत बदल करून किंवा मजुरीसाठीचे निकष शिथिल करून मजुरांचे उपासमारीचे संकट दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.
(२) धडगांव तालुक्यात काही ठिकाणी इंटरनेट नेटवर्क नसल्याने मजुरांची हजेरी नोंद होत नाही आणि मजुरी मिळण्यास विलंब होत असतो. तथापि, जनमनरेगा (Janmanrega) ॲपव्दारे फोटो काढून हजेरीपटांची देयके अदा करण्याची सवलत जिल्हाधिकारी कार्यालयास देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वनक्षेत्राच्या हद्दीत बेकायदेशीररित्या वृक्षतोड केल्याबाबत

**(६) * ९१०६ श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सचिन अहिर, श्री.प्रसाद लाड, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.सदाशिव खोत, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वनक्षेत्राच्या हद्दीत गत पाच वर्षात सुमारे साडेतीन लाखांहून अधिक वृक्ष बेकायदेशीरपणे तोडण्यात आले असून त्यात जवळपास ३८% म्हणजे सुमारे १ लाख २४ हजाराहून अधिक सागवानी झाडांचा समावेश असल्याची माहिती माहे एप्रिल, २०२६ च्या तिसऱ्या आठवड्यात माहितीच्या अधिकारातून निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बेकायदेशीर वृक्षतोडीमुळे राज्याच्या वनसंपत्तीचे ३० कोटी रुपयांहून अधिक नुकसान झाले आहे, तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील शिवना राखीव वनक्षेत्रात हजारो झाडांची कत्तल करून लाकूड माफियांनी जंगल नष्ट केल्याबाबत संबंधितांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणेबाबतची मागणी समर्थन संस्थेने मा.मंत्री (वने), जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर, अवर सचिव वने यांच्याकडे दिनांक १६ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने राज्यातील शिवना (सिल्लोड) सह अन्य वनक्षेत्रांतील या वृक्षतोडीची चौकशी करून संबंधित दोषी वन अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती प्रशासकीय किंवा दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, तसेच वाढत्या लाकूड तस्करीला आळा घालण्यासाठी वन गुन्हे नोंदविण्याची पध्दत अधिक कडक करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा (ड्रोन किंवा सॅटेलाईट मॉनिटरिंग) वापर आणि वनरक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) हे खरे आहे.
(२) सदर बेकायदेशीर वृक्षतोडीमुळे राज्याच्या वनसंपत्तीचे ३० कोटी रुपयांहून अधिक नुकसान झाले असले तरी एकूण पकडण्यात आलेल्या मालामुळे झालेली वसूली रुपये ३०.१४ कोटी इतकी झालेली आहे. समर्थन संस्थेने दिलेले निवेदन प्राप्त झालेले असून सदर निवेदनावर वनपरिक्षेत्र अधिकारी, अजिंठा तसेच सहायक वनसंरक्षक, सिल्लोड यांनी चौकशी करुन अहवाल सादर केलेला आहे. त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मौजे शिवना या गावात कोणतेही राखीव, संरक्षित, अवर्गीकृत वनक्षेत्र नाही. तसेच शिवना येथे झाडांची कत्तल झालेली नाही.
(३) मौजे शिवना या गावात कोणतेही राखीव, संरक्षित, अवर्गीकृत वनक्षेत्र नाही. तसेच शिवना येथे झाडांची कत्तल झालेली नसल्याने दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. अवैध वृक्षतोड प्रकरणी राज्यातील वनक्षेत्रपाल-४, वनपाल १२, वनरक्षक-१६ यांचेवर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. वाढत्या तस्करीला आळा घालण्यासाठी स्थायी संरक्षण कुटीवर संरक्षण मजुर लावण्यात येतात. तसेच वन अधिकारी/कर्मचारी यांचे समवेत जंगल गस्त करण्यात येते त्याचप्रमाणे तपासणी नाक्यावर येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येते. फिरते पथकाकडून नियमीतपणे आकस्मिक धाडी रात्रीची नाकाबंदी व गस्त करण्यात येते. जनतेमध्ये अवैध वृक्षतोड, अवैध लाकूड वाहतूक परिणामाबाबत जागरुकता निर्माण करण्यात येते. वनविभाग टोल फ्री क्रमांक कार्यान्वित असून प्राप्त तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यात येते. सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमीतपणे कालबध्द पध्दतीने नियतक्षेत्र तपासणी कार्यक्रम राबविण्यात येतो. वन अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग आढळून आल्यास नियमानुसार विभागीय चौकशी करण्यात येते. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७) * ८७५३ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प घोषित झाल्यापासून या क्षेत्रातील निर्बंधांमुळे मोहफुले संकलन, तेंदूपत्ता संकलन आणि इतर गौण वनोपजांवर आधारित जवळपास १० हजार आदिवासी बांधवांचा पारंपरिक रोजगार पूर्णतः बंद झाला असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्याघ्र प्रकल्पाच्या 'कोअर झोन' मध्ये साकोली तालुक्यातील अनेक गावांचा समावेश झाल्याने, वनविभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या वृक्षारोपण, झाडांची निगा राखणे व वनसंवर्धनाच्या कामांतून स्थानिकांना मिळणारा रोजगारही संपुष्टात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्याघ्र प्रकल्पामुळे वन हक्क कायद्यांतर्गत मिळणारे अधिकार व रोजगाराची साधने नष्ट झाल्याने या भागातील आदिवासी कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर बेरोजगारांना इको-टुरिझम किंवा वन पर्यटनात गाईड, वाहन चालक अथवा इतर कामांत प्राधान्याने सामावून घेण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही. नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प झाल्यापासून बफर क्षेत्रात वैधानिक दृष्ट्या योग्य पध्दतीने मोहफुले संकलन, तेंदूपाने संकलन, इतर गौणउपज संकलन व तसेच वनहक्क कायद्याअंतर्गत मिळणारे अधिकार व रोजगाराची साधने यावर कुठलेही बंधन नवेगाव-नागझिरा व्याघ्रप्रकल्पाच्या एकसंघ नियंत्रणामुळे आलेले नाही. तसेच व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर झोनमध्ये कुठल्याही गावाचे अस्तित्व नाही,

व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमध्ये समावेश असलेल्या गावांमध्ये वनविभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या वृक्षारोपण, झाडांची निगा राखणे इ.व निसर्ग पर्यटनाच्या कामामधून स्थानिकांना नियमित रोजगार उपलब्ध होत आहेत. तसेच मुरदोली पर्यटन गेट तसेच माधवझरी पर्यटन गेट व त्याचसोबत नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील इतर आठ सफारी गेटच्या माध्यमातून गाईड, जिप्सी चालक, जिप्सी मालक तसेच होम-स्टे इत्यादी उपक्रमांमध्ये आदिवासी बांधवांना वनांवर आधारित अपारंपारिक रोजगारही उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेत उष्माघाताचा समावेश करण्याबाबत

**(८) * ९६२३ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांसह संपूर्ण राज्यात तापमानात झालेली विक्रमी वाढ आणि त्यातून निर्माण झालेल्या उष्माघाताच्या लाटेमुळे शेतात काम करणाऱ्या अनेक शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नैसर्गिक आपत्ती आणि शेती कामाशी निगडित अपघातांमध्ये मदत देण्याचे शासनाचे धोरण असताना, केवळ तांत्रिक कारणास्तव उष्माघाताने मृत पावलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना आर्थिक लाभापासून वंचित ठेवले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उष्माघातामुळे होणारा मृत्यू ही देखील एक अनपेक्षित नैसर्गिक घटना असल्याने या योजनेच्या शासन निर्णयात सुधारणा करून उष्माघाताचा समावेश 'अपघात' या व्याख्येत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, अशा मृतांच्या वारसांना तातडीने आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेमध्ये उष्माघाताचा समावेश करण्याबाबत शासनस्तरावर कोणती विशेष कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) होय.

(२) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेंतर्गत पात्रतेसाठी ज्या आजारांचा समावेश करण्यात आला आहे, त्या आजारांमध्ये सध्या उष्माघाताचा समावेश नसल्यामुळे सद्य:स्थितीत उष्माघाताने मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना या योजनेचा लाभ देय ठरत नाही.

(३) व (४) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी विहित केलेल्या आजारांमध्ये उष्माघाताचा समावेश करण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात वाढत्या प्लास्टिक प्रदुषणामुळे वन्यजीवांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याबाबत

**(९) * ९५५८ श्रीमती भावना गवळी, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व्याघ्रप्रकल्प प्लास्टिकमुक्त ठेवण्याचे धोरण असतानाही, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील पाणवठ्यांजवळ वाघ व इतर वन्यजीवांच्या अधिवासात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा साचल्याने वन्यजीवांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याची व पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्लास्टिक कचरा हा पर्यटकांकडून, मजुरांकडून टाकला जात असल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर व्याघ्र प्रकल्प प्लास्टिकमुक्त

ठेवण्यासाठी, पाणवठ्यांचे संरक्षण करण्यासाठी व वन्यजीवांच्या सुरक्षेसाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

या प्रकल्पांतर्गत बफर विभाग क्षेत्रात माहे एप्रिल, २०२६ मध्ये काही प्रसार माध्यमांवर प्रसारीत व्हिडीओ क्लीपमध्ये केसलाघाट निसर्ग पर्यटन क्षेत्रात पाणवठ्यावर प्लास्टिक कचरा पडून असल्याचे सांगण्यात आले होते. परंतु, सदर व्हिडीओ क्लीप ची पडताळणी केली असता, संबंधित व्हिडीओ क्लीप ही ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील नसल्याचे निदर्शनास आले.

(२) पाणवठ्यांचे संरक्षण करण्यासाठी व वन्यजीवांच्या सुरक्षेसाठी या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या बफर विभागामार्फत प्लास्टिक मुक्त ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे:-

- ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील सर्व निसर्ग पर्यटन गेटवर सन २०१९ पासून प्लास्टिक मुक्त अभियान कार्यान्वित असून त्या दृष्टीकोनातून निसर्ग पर्यटन गेटवर पर्यटकांना पर्यटनादरम्यान कोणत्याही प्रकारचे प्लास्टिक बॉटल व कॅरीबॅग तसेच इतर प्लास्टिक आधारीत वस्तू नेण्यास मज्जाव करण्यात येतो.
- पानस्थळाची तपासणी वनामध्ये असलेल्या पानवठ्याचे क्षेत्रिय कर्मचारी व वनमजुरांकडून पाहणी करुन स्वच्छता करण्याची कामे केली जातात.
- निसर्ग पर्यटनदरम्यान प्रत्येक जिप्सी वाहनात स्वतंत्र डस्टबिन ठेवण्यात येते. जेणेकरून, पर्यटकांकडून आणण्यात आलेले प्लॅास्टिक पिशवी व इतर वस्तू गाईडमार्फत जमा करुन पर्यटन गेटवर असलेल्या कचरा कुंडीत जमा केले जातात.
- पर्यटनाकरीता येणाऱ्या पर्यटकांकडून प्लास्टिक कचरा संदर्भात नियमाचे उल्लंघन केल्यास पर्यटकांकडून दंडाची रक्कम वसूल करण्यात येते.
- बफर विभागातील प्रत्येक गावस्तरावर पथनाट्य, माहितीपट द्वारे स्वच्छता राबविणे व प्लास्टिकमुळे वन्यप्राण्यांना होणारे नुकसान याबाबत मार्गदर्शन करण्यात येते.
- झिरो वेस्ट ताडोबा हा ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प प्रशासनातर्फे राबवला जाणारा एक अत्यंत महत्वाकांक्षी उपक्रम आहे. संरक्षित क्षेत्र आणि त्याच्या सभोवतालच्या परिसरातील प्लास्टिकचा वापर कमी करणे, प्लास्टिकमुळे जंगलात होणारे प्रदूषण रोखणे आणि वन्यजीवांवर होणारा त्याचा कोणताही घातक व विपरीत परिणाम टाळणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. हा प्रकल्प मोहुर्ली गावातून प्रायोगिक तत्वावर सुरू झाला आणि ताडोबा बफर झोनमधील सर्व ८९ ते ९० गावांमध्ये तो पध्दतशीरपणे राबवला जात आहे.
- दर मंगळवारी गावकऱ्यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता मोहीम राबवली जाते. यात प्रत्येक गावातून १०० हून अधिक स्थानिक नागरिक, वन अधिकारी आणि विद्यार्थी सहभागी होतात.
- कचरा व्यवस्थापन आणि वर्गीकरण केंद्रे स्थानिक महिला आणि स्वयंसहाय्यता बचत गटांद्वारे चालवली जातात. यामुळे त्यांना थेट रोजगार मिळत आहे आणि स्थानिकांना पर्यावरण संवर्धन अर्थव्यवस्थेशी जोडले जात आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीकाठच्या वनक्षेत्रातून अवैधरित्या रेती उत्खनन होत असल्याबाबत

**(१०) * ९१४९ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील बेलगाव (वडेगाव रिती) व खमारी (बुटी) परिसरातील वनविभागाच्या संरक्षित जागेतून मोठ्या प्रमाणावर अवैध रेती उत्खनन व चोरी होत असल्याचे तसेच वैनगंगा नदीकाठी खमारी (बुटी) जवळील जंगल परिसरात सुमारे एक एकरपेक्षा अधिक क्षेत्रावर बेकायदेशीर उत्खननामुळे जमिनीची धूप व वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासाला धोका निर्माण झाल्याचे माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेती तस्करीवर नियंत्रण मिळविण्यासाठी वैनगंगा नदी पात्राजवळ उभारण्यात आलेली महसूल चौकी बहुतांश वेळ बंद असल्याने आणि कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे तस्करी वाढल्याने शासनाच्या लाखो रुपयांच्या महसुलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने बेकायदेशीर उत्खनन करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी व संवेदनशील वनक्षेत्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून गस्त घालण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) भंडारा तालुक्यातील बेलगाव (वडेगाव रीठी) परिसरात वन विभागाच्या हद्दीत अवैध रेती उपसाबाबत दिनांक २८/०३/२०२६ रोजी स्थानिक वृत्त पत्रात प्रकाशित झालेल्या बातमीच्या अनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी, भंडारा यांनी सदर जागेची स्थळपाहणी केली.

सदर स्थळपहाणीत बेलगाव (वडेगाव रिठी) व खमारी (बुटी) परिसरातील कक्ष क्र. २८२ PF मध्ये वन विभागाच्या जुन्याच खोदलेल्या जागेत रेती मिश्रीत मातीचे अवैध उत्खनन केल्याचे आढळून आले.

सदर प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ३३ अंतर्गत दिनांक २/१२/२०२५ रोजी वनगुन्हा नोंद करुन ट्रॉलीसह ट्रॅक्टर व इतर साहित्य जप्त केले होते. व तद्नंतर आरोपीविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(२) व (३) भंडारा तालुक्यातील रेती तस्करीवर नियंत्रण मिळविण्यासाठी मौजा खमारी, मौजा दाभा, मौजा मौदी व मौजा खरबी येथे चेकपोस्ट लावण्यात आलेले असून सदर चेकपोस्टवर वाहनांची तपासणी करण्याकरीता ग्राम महसूल अधिकारी, सहाय्यक महसूल अधिकारी, महसूल सहाय्यक, महसूल सेवक व पोलीस शिपाई यांची दिनांक ३०/०६/२०२६ पर्यंत २४X७ नियुक्ती करण्यात आलेली असून नियुक्त अधिकारी / कर्मचारी चेकपोस्टवर हजर राहतात.

तसेच भंडारा तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी माहे मे २०२६ पर्यंत एकूण १०८ प्रकरणी दंड आकारण्यात आले आहे. तसेच सदर वाहन मालक, चालक व वाहनावर एकूण ५४ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

उपाययोजना

१. वनक्षेत्रातून अवैधरीत्या रेतीची वाहतूक होऊ नये म्हणुन वनउपज तपासणी नाकाव्दारे वाहनांची नियमीत तपासणी करण्यात येते.

२. वनपरिक्षेत्र निहाय क्षेत्रिय कर्मचाऱ्यांची पथके तयार करण्यात आले असून, नियमीत गस्ती करण्यात येत आहे.

३. वन विभागामार्फत शिघ्र बचाव दल (RRT) गठीत करण्यात आलेला असून त्यांच्याद्वारे संवेदनशिल क्षेत्रामध्ये नियमित गस्त करण्यात येते.

४. वन विभाग व पोलीस विभाग यांचे संयुक्त पथकाव्दारे नाका बंदी करुन वाहनांची तपासणी करण्यात येते.

५. वन विभागातर्फे टोल फ्री क्रमांक १९२६ कार्यान्वित असून प्राप्त तक्रारीचे तात्काळ निवारण करण्यात येते. तसेच भंडारा वनविभागातील विभागीय कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील बांबू क्लस्टर योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(११)** * **९१३४ श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात मागील आर्थिक वर्षात बांबू क्लस्टर योजनेंतर्गत ३५ लाख बांबू रोपांची लागवड करण्याचा निर्णय घेतला असून, काही ठिकाणी काही प्रमाणात लागवड देखील करण्यात आली परंतु प्रत्यक्षात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यामुळे आणि योजनेचा वस्तुनिष्ठ लेखाजोखा सादर न केल्यामुळे सदर योजना पूर्णपणे अपयशी ठरल्याचे दिनांक ८ एप्रिल,२०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या प्रसिद्धीसाठी आणि मार्केटींगसाठी लाखो रुपये खर्चून खरेदी केलेली "डिस्प्ले व्हॅन" सध्या महाड येथील शासकीय विश्रामगृहाच्या परिसरात अत्यंत दुरवस्थेत विनावापर उभी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाच्या निधीचा अपव्यय करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२) व (३) जिल्हाधिकारी रायगड यांनी कळविल्यानुसार, रायगड जिल्ह्यात मागील आर्थिक वर्षात बांबू क्लस्टर योजना राबविण्यात आली नाही. तथापि, रायगड जिल्ह्यात सामाजिक वनिकरण, उपवनसंरक्षक रोहा, उपवनसंरक्षक अलिबाग, कृषी विभाग, जिल्हाधिकारी इत्यादी यांच्याकडून बांबू लागवड करण्यात आली आहे. तसेच क्षेत्रिय वनविभाग कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार प्रश्न भाग २ मध्ये उल्लेखीत "डिस्प्ले व्हॅन" खरेदी करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणासंदर्भात गठीत केलेल्या समितीचा अहवाल प्रकाशित करण्याबाबत

**(१२) * ८८११ ॲड.अनिल परब, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणासंदर्भात शिफारसी करण्यासाठी गठीत केलेल्या निवृत्त न्यायमूर्ती अनंत बदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून, सदर अहवाल सार्वजनिकरीत्या प्रकाशित करण्यापूर्वीच त्यावर हरकती व सूचना मागविण्याची प्रक्रिया माहे मार्च, २०२६ मध्ये सुरू करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत हरकती व सूचना मांडण्यासाठी शासनाने दिनांक १० एप्रिल, २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करून १५ एप्रिल, २०२६ पर्यंतची अत्यंत कमी मुदत दिली व सदर समितीने आपला अहवाल जनतेसाठी उपलब्ध करुन दिला नाही, तसेच उक्त अहवालातील नेमक्या कोणत्या मुद्द्यांवर हरकती नोंदवाव्यात याबाबत देखील शासनाने कोणताही खुलासा केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहवाल प्रसिध्द न करता सूचना मागविणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाच्या विरुध्द असल्यामुळे शासनाने सदर अहवाल प्रथम अधिकृतरीत्या संकेतस्थळावर प्रकाशित करून हरकतींसाठी मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या अनुषंगाने मा.न्यायमूर्ती श्री.अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने शिफारशींसह शासनास दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी सादर केलेला अहवाल मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक ०१ एप्रिल, २०२६ रोजीच्या बैठकीत निर्णयार्थ सादर करण्यात आला होता.तथापि, सदर बैठकीत अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या अनुषंगाने शासनाकडे प्राप्त निवेदने, सूचना व अर्जांचा विचार करण्यासाठी मा.मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करून या समितीने याबाबतची कार्यवाही करून अहवाल मा.मंत्रिमंडळासमोर सादर करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार शासन निर्णय दिनांक १० एप्रिल, २०२६ अन्वये संबंधितांना अर्ज व निवेदने सादर करण्यासाठी दिनांक १५ एप्रिल, २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

सबब, मा.मंत्रिमंडळाने बदर समितीने शासनास सादर केलेल्या अहवालावर अद्याप अंतिम निर्णय न घेतल्याने सदर अहवाल सार्वजनिकरीत्या प्रकाशित करण्यात आलेला नाही.

(३) मा.मंत्रिमंडळाने दिलेल्या निर्देशानुसार अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या अनुषंगाने संबंधितांना अर्ज व निवेदने सादर करण्यासाठी दिनांक १५ एप्रिल, २०२६ पर्यंत देण्यात आलेली मुदत दिनांक ३०/०४/२०२६ पर्यंत वाढवून देण्यात आली होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) मजुरी दरात वाढ करण्याबाबत

**(१३) * ८७०८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी राज्यातील मजुरी दर ३१२ रुपये इतकाच स्थिर ठेवण्यात आला असून, माहे एप्रिल, २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत कोणतीही दरवाढ जाहीर झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी १ एप्रिल पासून सुरु होणाऱ्या नवीन आर्थिक वर्षात मनरेगा मजुरी दरात वाढ जाहीर करण्याची प्रस्थापित पध्दत असतानाही, यंदा अद्याप दरवाढ करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर मजुरीच्या दरात सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून तातडीने मजुरीच्या दरात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) केंद्र शासनाव्दारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक आर्थिक वर्षाकरीता राज्यनिहाय मजुरी दर निश्चित करण्यात येतो. सदर विहीत मजुरी दरानुसार राज्यात मजुरांना रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरी अदा करण्यात येते. तथापि, चालु आर्थिक वर्ष २०२६-२७ करीता केंद्र शासनाने मजुरीचा दर अद्याप निश्चित केलेला नसल्याने जुन्याच दराने मजुरी अदा करण्यात येत आहे. तथापि, दिनांक १ जुलै, २०२६ पासून विकसित भारत-जी राम जी कायदा लागू होत असून सदर कायद्यात देखील मजुरी दर घोषीत करण्याची तरतुद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली वन विभागाच्या कुपवाड येथील कार्यालयात वन्य जीवांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१४) * ८८७० श्री.अरुण लाड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुपवाड (जि.सांगली) येथील वन विभागाच्या कार्यालयात वन्यजीवांसाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक सोयीसुविधांचा प्रचंड अभाव तसेच गंजलेले पिंजरे, औषधांचा तुटवडा, वाहनव्यवस्थेचा अभाव, आवश्यक साधनांची कमतरता आणि अपुरे मनुष्यबळ असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्ह्याच्या वन विभागाच्या आकृतीबंधात 'वन्यजीव पशुवैद्यक' हे पद मंजूर नसल्यामुळे जखमी वन्यजीवांवर उपचारासाठी सदर उपचाराचा विशेष अनुभव किंवा अधिकार नसलेल्या जिल्हा पशुवैद्यकीय विभागाच्या डॉक्टरांवर अवलंबून राहावे लागत असल्याने तांत्रिक अडचणी निर्माण होतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सांगली येथे “ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर” चे मंजूर काम प्रलंबित असून, सुसज्ज उपचार केंद्राच्या अभावामुळे जखमी वन्यजीवांना उपचारासाठी कराड (सातारा) येथे न्यावे लागत असल्याने वन्यजीवांच्या जीवितास धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुण्यातील कात्रज येथील ‘वन्यजीव बचाव व पुनर्वसन केंद्रा’च्या धर्तीवर सांगलीत अद्ययावत सुविधा, कायमस्वरूपी वन्यजीव डॉक्टर, आधुनिक शस्त्रक्रिया गृह आणि औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

सांगली वन विभागामधील सांगली वनक्षेत्रात कुपवाड येथे वन्यजीव बचाव कार्यासाठी आवश्यक साधन सामुग्री उपलब्ध आहे.

जुने साहित्याची (पिंजरे) निर्लेखनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच जखमी वन्यप्राण्यांना रेस्क्यू करुन पशुवैद्यकिय अधिकारी यांचेमार्फत औषधोपचार/उपचार करुन तंदुरुस्त झाल्यानंतर नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात येते. सन २०२५-२६ या वर्षामध्ये ११९ तर २०२६-२७ मध्ये ३० वन्य पशुपक्ष्यांना रेस्क्यू करुन नैसर्गिक अधिवासात मुक्त केले आहे.

जखमी वन्यप्राणी यांना मानवी वस्तीत आल्यानंतर तातडीने रेस्क्यू करुन आणणेसाठी २४ तास शासकीय वाहन उपलब्ध आहे. तसेच या ठिकाणी मनुष्यबळाची कमतरता नाही.
(२) सांगली वन विभागाच्या आकृतीबंधात पशुवैद्यकिय अधिकारी हे पद समाविष्ट नाही. तथापि, या ठिकाणी जखमी वन्यप्राणी व पक्षी यांना पशुवैद्यकिय विभागाच्या अनुभवी डॉक्टरांकडून प्राथमिक उपचार केले जातात.
(३) “ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर” साठी शासकीय जागा उपलब्ध झालेली नाही. गंभीर जखमी असणाऱ्या वन्यप्राणी व पक्ष्यांना तातडीने पुढील उपचारासाठी पुणे वन विभागाच्या अधिनस्त “ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर” बावधन (पुणे) येथे पाठविले जाते.
(४) सातारा वन विभागातील कराड येथील वराडे येथे “ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर” सुरू होत असून, तेथील सुविधांचा वापर करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) येथे अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत

**(१५) * ८९९७ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यात झालेल्या बिगर मोसमी पाऊस आणि गारपिटीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या काढणीला आलेल्या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवला तालुक्यातील बाधित क्षेत्राचे पंचनामे पूर्ण करण्यात आले आहेत काय, त्याची सद्य:स्थिती काय आहे, तसेच बाधितांची संख्या, बाधित झालेल्या क्षेत्राचा (हेक्टरनिहाय) आणि पिकांचे आर्थिक नुकसान याचा एकूण अंदाजित तपशील काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना 'एनडीआरएफ' व 'एसडीआरएफ' च्या निकषांनुसार किंवा विशेष पॅकेजच्या माध्यमातून आर्थिक मदत जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर मदतीचे वाटप कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) एप्रिल, २०२६ मधील कांदा पिकांचा मदत देण्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | बाधितांची संख्या | बाधित क्षेत्र हे.आर | निधी मागणी लाख |
|---|---|---|---|---|
| १) | येवला | ४० | ९.३८ | १.५९ |

(३) शासन निर्णय २७ मार्च, २०२३ मध्ये नमूद केल्यानुसार केंद्र शासनाच्या निकषानुसार (NDRF/SDRF) मदत देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विमा भरपाई नाकारण्यात आल्याबाबत

**(१६) * ९९६८ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पीक कापणी प्रयोगावर आधारित नवीन निकष लागू करताना कमी पाऊस, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, स्थानिक आपत्ती व काढणीपश्चात नुकसान यांसारखे महत्त्वाचे ट्रिगर्स (नुकसानीचे निकष) वगळले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील सुमारे १.८५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी मागील खरीप हंगामासाठी पीक विमा हप्ता भरला असताना, अतिवृष्टी व पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान होऊनही जिल्ह्यातील सुमारे १० तालुक्यांतील पात्र शेतकऱ्यांना पीक विमा भरपाई नाकारण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी विमा कंपनीच्या मनमानी कामकाजाची आणि शेतकऱ्यांना भरपाई नाकारल्याप्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, सदर चौकशीमध्ये काय आढळून आले आणि त्यानुसार अमरावती जिल्ह्यातील वंचित व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने विमा भरपाई मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच पीक विम्याच्या निकषांचा पुनर्विचार करून शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी शासन स्तरावर कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) होय.

प्रधानमंत्री पीक विमा योजना सन २०१६ च्या खरीप हंगामापासून राबविण्यात येत आहे. या योजनेच्या अंमलबजावणीकरीता केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार “पीक कापणी प्रयोग” यावर आधारित उत्पादनातील येणाऱ्या घटीच्या आधारे नुकसान भरपाई ही जोखीम बाब अनिवार्य आहे. तर अतिरिक्त ४ जोखीम बाबी या अनिवार्य नाही. राज्य शासनास अतिरिक्त ४ पैकी कोणत्याही जोखीम बाबींसहित किंवा विरहीत विमा योजना राबविण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र, राज्याने अनिवार्य तसेच अनिवार्य नसलेल्या अतिरिक्त ४ जोखीम बाबींचा समावेश करुन नुकसान भरपाई देण्याचे निश्चित केले होते.

मात्र, या सर्व जोखीम बाबींचा समावेश करुन आणि सन २०२३-२४ या वर्षात १ रुपयात पीक विमा योजना सुरु झाल्यावर, योजनेचा अयोग्य प्रकारे लाभ घेण्याच्या प्रवृत्तीत वाढ होऊन, मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने अनिवार्य केलेल्या पीक कापणी प्रयोगावर आधारित नुकसान भरपाई देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून, त्यानुसार सन २०२५-२६ पासून सुधारित पीक विमा योजना राबविण्यात येत आहे.

(२) खरीप हंगाम २०२५ मध्ये अमरावती जिल्ह्यात ३.६२ लाख विमा अर्जांद्वारे शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभाग घेतला आहे. दिनांक ११/०६/२०२६ अखेर जिल्ह्यातील १४ पैकी पात्र ५ तालुक्यांत रुपये २५३.९८ लाख नुकसान भरपाई निश्चित झाली आहे. त्यापैकी रुपये २३५.३३ लाख इतकी नुकसान भरपाई शेतकऱ्यांना देण्यात आली आहे. तर उर्वरीत नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) सन २०२५-२६ मध्ये राज्यात पीक उत्पादनावर आधारीत सुधारीत प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. योजनेच्या निकषानुसार ज्या महसूल मंडळातील पिकांच्या उत्पादनात उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत घट झाली आहे. केवळ तेथील शेतकरी नुकसान भरपाईसाठी पात्र ठरले आहेत.

काही जिल्ह्यांमध्ये तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन आणि प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोगानुसार आलेल्या उत्पादनातील मोठी तफावत केंद्र शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, संबंधित जिल्ह्यांच्या तंत्रज्ञानावर आधारित डेटा मॉडेल्सचे तांत्रिक पुनरावलोकन करणे, तफावतीची मूळ कारणे शोधणे आणि क्षेत्रिय परिस्थितीशी सुसंगतता आणण्यासाठी सुधारणात्मक उपाययोजना करण्याची विनंती केंद्र शासनास करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या निकषांतील सुधारणांबाबत केंद्र शासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) येथील मोरा व करंजा बंदरातील मच्छिमारांच्या व्यवसायावर डिझेल दरवाढीमुळे आर्थिक संकट आल्याबाबत

**(१७)** * **१०००५ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील मोरा व करंजा बंदरातील ‘पर्ससीन नेट’ आणि खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या सुमारे ३०० बोटींना मोठ्या प्रमाणावर डिझेल लागत असून माहे एप्रिल, २०२६ मध्ये डिझेल दरात झालेल्या प्रचंड वाढीमुळे प्रति खेपेस मच्छीमारांवर लाखो रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडत

असून या वाढीव खर्चामुळे व आर्थिक नुकसानीमुळे तीनशेहून अधिक बोटी बंदरातच उभ्या असून, मच्छीमारांचा पारंपरिक व्यवसाय पूर्णपणे ठप्प झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मच्छीमार सहकारी संस्थांचा समावेश अद्यापही 'होलसेल' ग्राहकांमध्येच असल्यामुळे त्यांना खुल्या बाजारापेक्षा अधिक दराने डिझेल खरेदी करावे लागत असून, शासनाकडून मिळणारी २१ टक्के कर सवलत किंवा डिझेल परतावा मिळण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डिझेल दरवाढ आणि सवलतींचा अभाव यांमुळे पारंपरिक मच्छीमार पूर्णपणे आर्थिक अडचणीत सापडले असून यावर मात करण्यासाठी तसेच मच्छीमारांना दिलासा देण्यासाठी डिझेलवरील मूल्यवर्धित करात सवलत देण्याबाबत अथवा थेट बँक खात्यात अनुदान वर्ग करण्याबाबत शासनस्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) हे अंशत खरे आहे.

मागील काही दिवसापासून सुरु असलेल्या अमेरिका व इराण युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेला इंधन तुटवडामुळे देशामध्ये इंधनाचे दर वाढलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. त्यानुसार महाराष्ट्रामध्ये डिझेलचे घाऊक दर (Bulk rates) किरकोळ दरांपेक्षा लक्षणीयरीत्या अधिक झालेले आहेत. सदरची दर वाढ झालेली असल्यामुळे याचा काही अंशी परिणाम मासेमारी व्यवसायावर झालेला आहे. डिझेल दर वाढ झालेली असल्यामुळे उपजीविकेचे प्राथमिक साधन असलेल्या मच्छिमारांवर इंधनाच्या वाढीव खर्चाचाबोजा पडत आहे.

(२) सदरची दर वाढ झालेली असल्यामुळे याचा परिणाम मासेमारी व्यवसायावर झालेला असल्याने सदरची दर वाढ कमी करण्याबाबत मच्छिमार सहकारी संस्था यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आलेली आहेत. राज्यातील मच्छिमारांना आवश्यक असलेले डिझेल हे किरकोळ दर या प्रवर्गातून पुरवठा होण्याबाबत शासनाने दिनांक २३/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मा.केंद्रिय मंत्री, पदुम, भारत सरकार यांना कळविलेले आहे. सदरची बाब ही केंद्र शासन स्तरावरील धोरणात्मक बाब आहे.

(३) डिझेल परतावा या योजनेंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता रुपये १२५.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत माहे एप्रिल २०२६ पर्यंत प्रलंबित असलेल्या प्रस्तावानुसार रुपये २५.०० कोटी इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकरी गटांना खरीप हंगाम २०२५ मध्ये वितरीत केलेल्या कृषी निविष्ठा किट वितरण प्रक्रियेत अनियमितता व गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८) * ९२१३ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.हेमंत पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप हंगाम २०२५ मध्ये शेतकरी गटांना वितरित करण्यात आलेल्या कृषी निविष्ठा किट वितरण प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार झाल्याची बाब माहे एप्रिल,२०२६ मध्ये शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाराशिव जिल्ह्यात सदर निविष्ठा वितरणासाठी सुमारे २२ कोटी रुपयांचा खर्च दाखविण्यात आला असताना,प्रत्यक्षात शेतकऱ्यांना केवळ बियाण्यांचे वाटप झाले व इतर आवश्यक साहित्याचे वितरण न करताच पूर्ण बिलांची उचल करण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील इतर विविध जिल्ह्यांमध्येही या प्रक्रियेत अपारदर्शकता,अपूर्ण साहित्याचा पुरवठा आणि आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त तक्रारींच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत दोषी आढळलेले अधिकारी, पुरवठादार किंवा संबंधित यंत्रणांवर आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) अंशतः खरे आहे.

लातूर विभागातील धाराशिव जिल्ह्यातून याबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२) अंशतः खरे आहे. लातूर विभागातील धाराशिव जिल्ह्यातून अशी तक्रार प्राप्त झाली असून सद्य:स्थितीत चौकशी सुरु आहे.
(३) धाराशिव वगळता राज्यातील इतर जिल्ह्यातून कोणत्याही तक्रारी प्राप्त नाहीत.
(४) लातूर विभागातील धाराशिव जिल्ह्यातून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने विभागीय कृषी सह संचालक लातूर यांचेकडून चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जमिनीच्या मोजणी खाजगी भूमापकांकडून करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(१९)** * **९५०४ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महसूल व भूमी अभिलेख विभागात अनेक पदे रिक्त असल्याने राज्यात जमिनीच्या मोजणीची अनेक प्रकरणे प्रलंबित असून, सदर प्रकरणे वेळेवर निकाली काढण्यासाठी शासनाने खाजगी भूमापकांकडून मोजणी करून घेण्याचा निर्णय माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संपूर्ण राज्यात सुमारे तीन लाखांहून अधिक मोजणीची प्रकरणे प्रलंबित असून, सर्वसामान्यांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी खाजगी भूमापकाची मदत घेतली जाणार असल्यामुळे मोजणी शुल्कात वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोजणीच्या वाढीव शुल्काचा भार सर्वसामान्य खातेदारांवर पडू नये तसेच भूमी अभिलेख विभागातील रिक्त असलेली पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक २५/०३/२०२६ अन्वये प्रलंबित मोजणी प्रकरणे, पोटहिस्सा मोजणी प्रकल्प तसेच ग्रामीण शिव पाणंद रस्ते मोजणी व सिमांकन इत्यादी कामासाठी जिल्हास्तरावर परवानाधारक भूमापक/ भूमापन अभिकरण यांची मोजणीकामी नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) व (३) परवानाधारक भूमापकाची नियुक्ती केली जाणार असली तरी मोजणी शुल्कात कोणतीही वाढ होणार नाही. त्यामुळे सर्वसामान्य खातेदारांवर वाढीव मोजणी शुल्काचा भार पडणार नाही.

सद्य:स्थितीत राज्यात १,२८,२९० मोजणी प्रकरणे प्रलंबित असून त्यापैकी ३८,६६६ मोजणी प्रकरणांत मोजणी पूर्ण असून सदर प्रकरणे हद्दी दाखविणेवर व कार्यालयीन कामावर आहेत. तसेच ४२,२२५ मोजणी प्रकरणे भूकरमापकाकडे मोजणी होणेवर प्रलंबित असून उर्वरीत ४७,३९९ मोजणी प्रकरणे कार्यालयात वाटपावर प्रलंबित आहेत.

भूमी अभिलेख विभागातील भूमापकांची रिक्त असलेली ९०३ पदे भरण्याबाबत सन २०२५-२६ मध्ये भरती प्रक्रिया राबवून ७५८ भूमापकांची भरती प्रकिया पूर्ण झालेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बेसा, नागपूर येथील शासकीय वसतिगृहात विद्यार्थीनींना निकृष्ट दर्जाचे भोजन देण्यात येत असल्याबाबत

**(२०) * ८७४६ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गतच्या बेसा, नागपूर येथील १००० विद्यार्थिनींची क्षमता असलेल्या शासकीय वसतिगृहात विद्यार्थिनींना देण्यात आलेल्या जेवणाच्या थाळीमध्ये अळया व कीटक आढळल्याचे माहे मे, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकृष्ट अन्नामुळे अनेक विद्यार्थिनींना विषबाधा व पोटाचे विकार सुरु झाल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, विद्यार्थिनींनी यापूर्वी देखील वारंवार लेखी तक्रारी करूनही प्रशासनाने त्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने भोजनाचा दर्जा तपासण्यात कसूर करणाऱ्या संबंधित गृहपाल (Warden) व जबाबदार कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच भविष्यात राज्यातील सर्व शासकीय वसतिगृहांमध्ये उच्च दर्जाचे, सकस व स्वच्छ भोजन उपलब्ध करून देण्यासाठी शासन ‘भोजन समिती’ गठीत करण्याबाबत वा भोजनाचे त्रयस्थ संस्थेद्वारे ऑडीट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१), (२) व (३) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले वसतिगृह, बेसा नागपुर या वसतिगृहामध्ये निकृष्ट दर्जाचे भोजन पुरवठा होत असल्याची तक्रार सदर वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांनी सहायक आयुक्त, समाजकल्याण, नागपुर यांना माहे एप्रिल, २०२६ करण्यात आलेली आहे. तसेच सदर वसतिगृहामध्ये निकृष्ट दर्जाचे भोजन पुरवठा होत असल्याची बातमी पुण्यनगरी या दैनिक वृत्तपत्रामध्ये दिनांक ०७/०४/२०२६ रोजी प्रसिध्द झाली आहे.

सदर प्रकरणी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर यांचे स्तरावर चौकशी समिती गठीत करण्यात येऊन सदर वसतिगृहास भोजन पुरवठा करणाऱ्या उपपुरवठादार यांना बदलण्यात आलेले आहे. तसेच राज्यातील सर्व शासकीय वसतिगृहांमध्ये उच्च दर्जाचे, सकस व स्वच्छ भोजन उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक न्याय विभाग, शासन निर्णय दिनांक १९ जून, २०२५ अन्वये भोजन पुरवठा करण्यासाठी नियुक्त भोजन पुरवठादारांनी विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करताना ई निविदेतील अटी शर्तीचे उल्लंघन केल्यास पुरवठादारांना आकारावयाचे दंडाचे निकष निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर यांचे शिफारशीनुसार नागपुर जिल्ह्यातील भोजन पुरवठा करणाऱ्या पुरवठादारास सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या देयकांमधून रुपये १३,५४,०८६/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे.

वसतिगृहांमध्ये उच्च दर्जाचे, सकस व स्वच्छ भोजन उपलब्ध करून देण्यासाठी सर्व वसतिगृह स्तरावर विद्यार्थी भोजन समिती गठीत करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील बावनथडी प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांकरीता कमकासूर येथे जलसमाधी आंदोलन केल्याबाबत

**(२१) * ९१५० डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बावनथडी (ता.तुमसर, जि.भंडारा)(राजीव सागर) प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ प्रकल्पग्रस्तांनी कमकासूर येथे ‘जलसमाधी आंदोलन’ केले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बावनथडी प्रकल्पाचे काम सुरू होऊन ५४ वर्षे उलटली तरी, अनेक बाधित कुटुंबांचे पुनर्वसन अद्याप पूर्ण झालेले नाही आणि विशेषतः आदिवासी बांधवांच्या वस्त्यांमध्ये रस्ते, पाणी, वीज यांसारख्या मूलभूत सोयीसुविधांचा अभाव असल्याने विकास नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विविध आदेशांचे पालन न झाल्यामुळे प्रकल्पग्रस्तांना ५० टक्के आरक्षणाचा लाभ मिळण्यात अडचणी येत आहेत तसेच घरांसाठी व शेतीसाठी मिळणारा मोबदला जुन्या दराप्रमाणे दिला जात असून प्रकल्पग्रस्त दाखल्यांचे वाटप वेळेत न झाल्यामुळे बाधित कुटुंबातील सुशिक्षित बेरोजगार युवक शासकीय नोकरीच्या संधींपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच ‘प्रकल्प पूर्ण होण्यापूर्वी पुनर्वसन’ अशी सुधारणा करण्याकरीता शासनस्तरावर कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) होय हे खरे आहे. दिनांक ०१/०५/२०२६ रोजी मौजा कमकासूर येथे प्रकल्पग्रस्त समिती व बुडीत क्षेत्रातील ग्रामस्थांनी वाढीव पुनर्वसन अनुदान व इतर मागण्यांसाठी “जलसमाधी आंदोलन” केले.

(२) हे खरे नाही.

मध्यम प्रकल्प विभाग, गोंदिया यांच्यामार्फत बावनथडी प्रकल्पांतर्गत भंडारा जिल्ह्यातील तिन्ही बाधित गावठाणे (सितेकसा, सुसुरडोह व कमकासूर) येथील एकूण ३०९ बाधित कुटुंबांचे पुनर्वसन जून २०१२ मधील घळभरणीपूर्वीच नवीन गावठाणांमध्ये (खापाखुर्द, गर्रा बघेडा व रामपूर हमशा) पूर्ण करण्यात आले आहे. पुनर्वसित गावठाणांमध्ये १८ नागरी सुविधांची कामे पूर्ण करण्यात आली असून सदर गावे दिनांक २५/०२/२०१३ च्या पत्रान्वये जिल्हा परिषद, भंडारा यांना हस्तांतरित करण्यात आली आहेत.

(३) हे खरे नाही.

१) महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त पुनर्वसन अधिनियम, १९९९ च्या कलम १०(६)(अ) नुसार, शासन विभाग, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था व शासन-अनुदानित संस्था यांच्या वर्ग-३ व वर्ग-४ सेवांमधील नियुक्तींमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या नामनिर्देशितांसाठी किमान ५ टक्के प्राधान्य कोटा विहित करण्यात आला आहे. याशिवाय, कलम ६(क) नुसार प्रकल्प आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ पदांकरीता प्रकल्पग्रस्तांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींना सर्वोच्च प्राधान्य देणे बंधनकारक असून त्यापैकी ५० टक्के नियुक्त्या या त्याच प्रकल्पाद्वारे बाधित व्यक्तींच्या नामनिर्देशितांमधून करणे अपेक्षित आहे. हे ५० टक्के केवळ प्रकल्प आस्थापनेपुरते मर्यादित असून सर्व शासकीय सेवांना लागू नाही.

२) बाधित घरांचा व शेतीचा मोबदला भूसंपादन अधिकारी यांनी पारित केलेल्या अंतिम निवाड्यानुसार देण्यात आला आहे.

३) शासनाच्या प्रचलित नियम व तरतुदींनुसार बावनथडी प्रकल्पग्रस्तांना एकूण १६३ प्रकल्पग्रस्त दाखले वाटप करण्यात आले आहेत. तथापि, प्रकल्पग्रस्तांच्या विशेष मागणीनुसार मौजा सुसुरडोह येथे दिनांक ११/०५/२०२६ रोजी शिबीर आयोजित करण्यात आले असून शिबीरात प्राप्त ५ अर्जानुसार संबंधितांना प्रकल्पग्रस्त दाखले वाटप करण्यात आले आहेत.

(४) बावनथडी प्रकल्प पूर्ण होण्यापूर्वीच बाधितांचे पुनर्वसन पूर्ण करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेमार्फत आदिवासी विद्यार्थ्यांकरीता प्रशिक्षणाचे वर्ग अद्याप सुरु केले नसल्याबाबत

**(२२) * ९१३५ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (टीआरटीआय) आदिवासी विद्यार्थ्यांकरीता केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग व महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा यांसारख्या विविध स्पर्धा परीक्षांच्या प्रशिक्षण योजना राबविल्या जात असून सदर प्रशिक्षणासाठी राज्यातील सुमारे १ लाख ३ हजार ७४२ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते व त्यापैकी साधारणत: ७२,९७३ विद्यार्थ्यांनी माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर, २०२५ दरम्यान 'सामायिक प्रवेश परीक्षा' दिली असून सदर परीक्षेचा निकाल माहे जानेवारी, २०२६ मध्ये जाहीर झाला असून ४ महिने झाले तरी या प्रशिक्षणाचा कार्यक्रम अद्याप सुरु झाला नाही, तसेच प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेला सुरुवातच झाली नसल्याचे दिनांक २० एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रशिक्षणाचा कार्यक्रम अद्याप सुरु झाला नसल्याने पुण्यासारख्या शहरात प्रशिक्षणासाठी येणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल आदिवासी विद्यार्थ्यांना खानावळ व निवासाचा खर्च परवडत नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून टीआरटीआय संस्थेकडून काहीच प्रतिसाद मिळत नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच सदर प्रशिक्षण कार्यक्रम त्वरित सुरु करुन विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके :** (१) हे खरे आहे.

(२) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ ते दिनांक २२ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत निवड झालेल्या उमेदवारांना पूर्व प्रशिक्षण योजनानिहाय त्यांच्या इच्छेनुसार प्रशिक्षण संस्थांच्या निवडीकरीता ऑनलाईन विकल्प पोर्टल उपलब्ध करुन देण्यात आले. तद्नंतर दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ ते दिनांक ०९ मार्च, २०२६ यादरम्यान उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची तपासणीची (Original Document Verification) प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. पुढील सर्व प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करुन दिनांक ०४ मे, २०२६ पासून युपीएससी नागरी सेवा-परीक्षा, एमपीएससी-राज्यसेवा अराजपत्रिक, न्यायिक सेवा, अभियांत्रिकी सेवा, PSI/STI/ASO व गट क सेवा परीक्षा, बँक (IBPS), रेल्वे, एल. आय. सी. व लिपिक वर्गीय पदांकरीताच्या परीक्षा, स्टाफ सिलेक्शन कमिशन, महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा (TET), GRE/TOEFL/IELTS/GMAT व परकीय भाषा स्पर्धा परीक्षांचे पूर्व प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आले.

(३) व (४) प्रशिक्षण कार्यक्रमास विलंब होत असल्याबाबत शासनाकडे प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने शासनाकडून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेला वेळावेळी कळविण्यात आलेले असून वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनाकडे प्राप्त करुन घेण्यात आलेला आहे.

-----------------

## सांगली जिल्ह्यामध्ये रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत कमी झाल्याबाबत

**(२३)** * **८९१० श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यामध्ये अधिक उत्पादनाच्या उद्देशाने रासायनिक खतांचा बेसुमार वापर करण्यात येत असून, सद्य:स्थितीत हे प्रमाण सरासरी हेक्टरी १४१ किलोपर्यंत वाढल्यामुळे जमिनीचा पोत व कस कमी होत चालल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी आयुक्तालयाच्या आकडेवारीनुसार गेल्या चार वर्षांत रासायनिक खतांच्या वापरात बेसुमार वाढ झाल्यामुळे जमिनीचा सामू बिघडून जमिनी 'आम्लधर्मीय' होत चालल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे अन्नसाखळीत रासायनिक अंश आढळत असून, यामुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन कर्करोग, मुत्रपिंडाचे विकार व पोटाचे आजार वाढत असल्याचे विविध आरोग्य अहवालांतून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रासायनिक खतांचा वापर कमी करून मातीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविण्यासाठी शेणखत, कंपोस्ट व गांडूळ खतांच्या वापराला प्रोत्साहन देण्याकरीता शासन स्तरावर कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) कृषी विभागाकडे सदर बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) मातीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविण्यासाठी व रासायनिक खतांचा संतुलित वापर प्रोत्साहित करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांचे मातीचे नमूने तपासणी करुन गरजेनुसार गांडूळ खत, शेणखत, कंपास्ट, सेंद्रीय खत तसेच हिरवळीचे खत व जैवखते यांचा वापर करुन तसेच शेतकरी प्रशिक्षण, शेतीशाळा, प्रात्यक्षिके व जनजागृती करुन सेंद्रीय शेतीस प्रोत्साहन दिले जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भटाळा व मोवाळ (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथील पुरातत्वीय स्थळांच्या परिसरात अवैधरित्या उत्खनन केल्याबाबत

**(२४) * ८७५८ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भटाळा व मोवाळ (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) या गावांमधील अतिप्राचीन व प्रागैतिहासिक पुरातत्वीय स्थळांच्या परिसरात अवैधरित्या उत्खनन व खाणकाम झाल्याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर अहवाल सादर केला आहे काय तसेच सदर पुरातत्वीय स्थळांच्या संरक्षित क्षेत्रात किंवा बफर झोनमध्ये खाणकाम करण्यासाठी शासनाच्या संबंधित विभागाने (पुरातत्व विभाग व महसूल विभाग) परवानगी दिली होती काय,
(३) असल्यास, पुरातत्वीय स्थळांचे नुकसान करणाऱ्या संबंधित कंपनी व इसमांविरुध्द 'प्राचीन स्मारके व पुरातत्वीय स्थळे आणि अवशेष अधिनियम' तसेच भारतीय दंड संहितेनुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत व या स्थळांच्या संरक्षणासाठी कायमस्वरूपी यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मौजे भटाळा (ता.वरोरा) येथील राज्य संरक्षित प्राचीन स्मारकांच्या परिसरात झालेल्या अवैध उत्खननाबाबत मा.मुंबई उच्च न्यायायल, खंडपीठ नागपूर येथे दाखल सुमोटो जनहित याचिका क्रमांक २०/२०२६ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक ०७/०४/२०२६ अन्वये अहवाल सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना निर्देश दिले आहेत.

(२) मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दिनांक १८/०४/२०२६ रोजी अहवाल सादर केला आहे. मौजे भटाळा, ता.वरोरा येथील ग.नं.४४ मधील ऋषी तलावास प्राचीन व ऐतिहासिक स्मारक संरक्षीत स्मारक म्हणून पर्यटन व पुरातत्व विभागाचे दिनांक ०४/१२/२०१२ रोजी जाहीर करण्यात आले असून, सदर ग.नं. ४४ मधून कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात आलेली नाही. मात्र ग.नं.४४ मधील ऋषी तलाव ऐतिहासिक संरक्षित स्मारक जाहीर करण्यापुर्वी मौजे भटाळा येथील ग.नं. ३६ मध्ये सन २००४ ते २००९ या कालावधीत एकूण ११ जणांना खाणपट्ट्याची परवानगी देण्यात आलेली होती.
(३) सहायक संचालक (पुरातत्व), नागपूर विभाग, नागपूर यांच्या अहवालानुसार पुरातत्व विभागाने कोणत्याही प्रकारच्या खाणकाम किंवा उत्खननास संरक्षित क्षेत्रात अथवा बफर झोनमध्ये कधीही परवानगी दिलेली नाही. उत्खनन हे पुरातत्व विभागाच्या संरक्षित हद्दीबाहेर होत असल्याने प्राचीन स्मारककडे व पुरातत्वीय स्थळे आणि अवशेष अधिनियमान्वये कार्यवाही प्रस्तावित करात येऊ शकत नसल्याचे नमूद केले आहे. मात्र उत्खननामुळे स्मारकाच्या पायथ्याला व भुगर्भीय स्थिरतेला धोका निर्माण झाल्याने पुरातत्व विभागाने पोलीस स्टेशन शेनाव बुद्रुक, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार वरोरा, यांना दोषीवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत दिनांक १०/०३/२०२५, २९/१२/२०२५ व एप्रिल, २०२६ रोजी कळविलेले आहे.

जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी मौजे भटाळा येथील ग.नं. ३६ मधून अवैध उत्खनन होऊ नये यासाठी कुंपन लावण्याच्या सूचना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक, १ चंद्रपूर यांना सूचना दिलेल्या आहेत. तसेच, सदर गटातून उपविभागीय अधिकारी, वरोरा व तहसिलदार, वरोरा यांना गौण खजिनजासाठी उत्खनन वाहतून व परवानगी न देण्याच्या सुचना दिल्या आहेत. उत्खनन व वाहतूक होऊ नये यासाठी ग्रामस्तरावर, तालुकास्तरावर, जिल्हास्तरावर समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

जिल्हा नियोजन समितीकडून मौजे भटाळा येथील ऋषी तलाव, महादेव मंदीर, भवानी मंदीरात या सुरक्षित स्थळ विकसित व सुरुवात करण्याकरीता सन २०२४-२५ मध्ये ३७९.८५ लक्ष एवढा निधी मंजूर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: सांगली व नांदेड जिल्ह्यांमध्ये रासायनिक खतांची टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(२५) * ८९४० श्री.अरुण लाड, श्री.हेमंत पाटील, श्री.संजय खोडके, श्री.सदाशिव खोत, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जागतिक स्तरावरील युध्दजन्य परिस्थिती आणि पुरवठा साखळीतील अडथळयांमुळे रासायनिक खतांच्या उपलब्धतेवर मोठा परिणाम झाला असून सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यात प्रामुख्याने द्राक्ष, ऊस, केळी आणि भाजीपाल्याचे उत्पादन अधिकतम घेतले जात असून या पिकांसाठी मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांची आवश्यकता असताना सध्या बाजारात युरिया, डीएपी आणि पोटॅश यासारख्या प्रमुख खतांची टंचाई व दरवाढ, पिकांचा वाढता उत्पादन खर्च इ. मुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्ह्यातही युरिया खताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असून मागील वर्षी माहे एप्रिल महिन्यात नांदेड जिल्ह्यात १२ हजार टन युरिया उपलब्ध झालेला असून यावर्षी एप्रिल, २०२६ अखेर केवळ २६०० टन युरिया उपलब्ध झाल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांसमोर आगामी खरीप हंगामातील पेरणीकरीता अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात खते उपलब्ध करून देण्याबाबत, अनुदानात वाढ करण्याबाबत, युरिया खताशी असलेले इतर खतांचे लिकींग बंद करणेबाबत तसेच बनावट रासायनिक खतांची विक्री रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यात युरिया खताचा ४३४.२४५ मे.टन व डीएपी खताचा १०९ मे.टन व इतर खते २४०१.३७ मे टन साठा उपलब्ध आहे. तसेच या तालुक्यामध्ये युरिया खताचा २३१.३ मे.टन व डीएपी खताचा ३० मे टन संरक्षित साठा करण्यात आला आहे. युरिया व डीएपी खतांव्यतिरिक्त इतर रासायनिक खतांच्या किंमतीमध्ये वाढ झाली आहे.
(२) युरिया खताचा सन २०२५ च्या एप्रिल महिन्याच्या तुलनेत यावर्षी एप्रिल महिन्यामध्ये कमी प्रमाणात पुरवठा झाला होता.परंतु जून, २०२६ मध्ये १५७०० मे.टन पुरवठा झालेला असून पूर्वीचा २३७६९ मे.टन साठ्यासह एकूण ३९४६९ मे.टन युरिया खत उपलब्ध आहे. तसेच खताची टंचाई भासू नये याकरीता ४९९४ मे.टन युरिया खताचा संरक्षित साठा करण्यात आलेला आहे.
(३) रासायनिक खतांवरील अनुदान केंद्र शासनाकडून देण्यात येते. राज्यातील शेतकऱ्यांना तक्रार नोंदवण्यासाठी जिल्हा तसेच राज्य स्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत. यासाठी राज्य स्तरावरील टोल फ्री क्रमांक १८०० २३३ ४००० व व्हाटसअॅप क्रमांक ९८२२४४६६५५ शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून युरिया खतांसोबत इतर खते लिंकींग करु नयेत याकरीता राज्यातील अनुदानित खतांचे उत्पादक/पुरवठादार कंपन्यांना अनुदानित रासायनिक खतांसोबत इतर विनाअनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते व जैवउत्तेजके यांचा पुरवठा व विक्री करण्यास शासनाने दिनांक २०/०५/२०२६ च्या आदेशान्वये मनाई करण्यात आली आहे.

तसेच सर्व कृषी सेवा केंद्रामध्ये लिकींग न करण्याबाबत फलक लावण्यात आलेले आहेत. कृषी निविष्ठांच्या तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करण्याकरीता राज्य, विभाग व जिल्हा स्तरावर भरारी पथके स्थापन केलेली असून त्यांच्या मार्फत तसेच खत निरीक्षकांमार्फत उत्पादक केंद्र व विक्री केंद्रांची नियमीत तपासणी करुन नियमोचीत कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. विलास आठवले**
**मुंबई.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.